**नागपूर-गोवा (पवनार ते पत्रादेवी) प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाच्या (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) सुधारित आखणीस मान्यता.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक. खाक्षेस-२०२३/प्र.क्र.५५६/भाग-१/रस्ते-८**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ०१ एप्रिल, २०२६.

**संदर्भ** :- १) सा.बां.वि.शा.नि.क्र.खाक्षेस-२०२३/प्र.क्र.५५६/रस्ते-८ दि.०७.०२.२०२४
२) सा.बां.वि.शा.नि.क्र.खाक्षेस-२०२५/प्र.क्र.१७१/रस्ते-८ दि.२८.०८.२०२५

**प्रस्तावना :-**

दि.०७.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नागपूर - गोवा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) पवनार, जि.वर्धा ते पत्रादेवी, जि.सिंधुदुर्ग या ८०२.५९२ कि.मी लांबीच्या आखणीस मान्यता देण्यात आली होती.

सदर आखणीनुसार महामार्गासाठी महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ नुसार भूसंपादन करण्याच्या अनुषंगाने प्रसिध्द केलेली प्रारंभिक अधिसूचना कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भूदरगड, आजरा तालुक्यातील मंजूर आखणीसाठी दि.१५.१०.२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये रद्द करण्यात आली. तद्नंतर दि.२८.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पवनार ते सांगली दरम्यानची आखणी कायम ठेवण्यास मान्यता देऊन उर्वरित आखणीचे उपलब्ध सर्व पर्याय व संभाव्य पर्याय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने तपासून शासनास सादर करण्याचे निर्देशित केलेले होते.

संबंधित मा.मंत्री व मा.लोकप्रतिनिधी यांचेशी चर्चा करून व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मार्गदर्शक तत्वांना (इंडियन रोड कॉँग्रेस विशेष पब्लिकेशन क्र.१९:२०२० च्या मूल्यांकन मॅट्रीक्स) अनुसरुन प्रत्यक्ष स्थळ पाहणीनुसार विविध पर्यायी आखणींचा अभ्यास करुन तुलनात्मक दृष्टया सर्वाधिक सुयोग्य अशी सुधारीत आखणी अंतिम करुन प्रस्तावित केलेली आहे.

सदर प्रस्तावानुसार महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग वर्धा, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातुर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापुर, सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यांतून, ४० तालुक्यांमधून जात असून सदर महामार्गामुळे महाराष्ट्रातील प्रमुख शक्तीपीठे माहूर, तूळजापूर, कोल्हापूर यांचेसह २१ धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. सदर महामार्गामुळे नागपूर ते गोवा हा सद्य:स्थितीतील १८ तासांचा प्रवास साधारणत: ८ तासावर येणे अपेक्षित आहे.

पवनार, जि.वर्धा ते पत्रादेवी, जि.सिंधुदुर्ग या महाराष्ट्र गोवा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाची (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) सुधारीत आखणी अंतिम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

मूळ मंजूर आखणीपैकी वर्धा, यवतमाळ, बीड व लातुर या जिल्ह्यांमधील आखणी कायम ठेवून नांदेड, हिंगोली, परभणी, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापुर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील मूळ मंजूर आखणीमध्ये सुधारणा करुन व सातारा जिल्ह्यामधील आखणी नव्याने अंतर्भूत करुन महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग दिग्रज, ता.जि.वर्धा ते बांदा, ता.सांवतवाडी, जि.सिंधुदुर्ग पर्यंत (**साखळी क्र. कि.मी.०.००० ते कि.मी. ८५६.७६५**) सुधारीत आखणीस मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०११३१७१८६५१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJESH PANDURANG BHOGALE

Digitally signed by RAJESH PANDURANG BHOGALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Works Department,
2.5.4.20=51B182059975E06FE7AE06D78BF4002A17B8FEAB991661E8CA9080DB69476086, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=4E96AF0E060BF5C8177FDD0B734DE165DA79BE741E964CD9AA763A580A557600, cn=RAJESH PANDURANG BHOGALE
Date: 2026.04.01 13:18:40 +05'30'

**(राजेश पां. भोगले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री, (नगर विकास, गृहनिर्माण, सा. बां. (सा.उ.)) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री, (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य.
८) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेय) मुंबई.
१०) महालेखापाल महाराष्ट्र २ (लेखापरिक्षा) नागपूर.
११) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई.
१४) अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान सचिव (विधि व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई.
१६) प्रधान सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
१७) प्रधान सचिव (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग), मंत्रालय, मुंबई.
१८) प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग), मंत्रालय, मुंबई.
१९) प्रधान सचिव (पर्यटन विभाग), मंत्रालय, मुंबई.
२०) प्रधान सचिव (पर्यावरण विभाग), मंत्रालय, मुंबई.
२१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि. महामंडळ, वांद्रे, मुंबई-५०.
२३) मुख्य अभियंता, म.रा.र.वि. महामंडळ, वांद्रे, मुंबई-५०.
२४) सर्व सहसचिव/ आंतर वित्तीय सल्लागार तथा उप सचिव/ उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५) निवडनस्ती (रस्ते-८).